२०१० महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरिक चरितार्थ व कल्याण कायदा २००७ व अधिनियम

प्रशिक्षकांसाठी अधिक वाचन साहित्य

व्दारे प्राप्त : ॲड.निसळ (कायदे सल्लागार)

FESCOM, महाराष्ट्र

महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरिक तरितार्थ व कल्याण कायदा २००७ व अधिनियम २०१०

अ) सन २००७ च्या या कायद्याखाली, आपली काळजी न घेणाऱ्या मुलांविरोधांत / वारसांविरोधांत तक्रार नोंदवितांना, तक्रार करुं इच्छिणारांनी खाली नमूद केलेल्या **संभाव्य धोक्यांचा विचार करुन तशी मानसिक तयारी करुन ठेवणे आवश्यक आहे.**

१) तुम्ही मुलांच्या घरांत राहून तक्रार करणार असाल, तर, "जळांत राहून माशाशी वैर करणे" होणार आहे. या परिस्थितीत जर मुलांवर तुम्ही पूर्णत: अवलंबून असाल, तर मुले कदाचित तुम्हांला घराबाहेर काढूं शकतील. विशेषत: घर तुमच्या नांवे नसेल व मुलांच्या/वारसांच्या नांवे असेल तर हा धोका जास्त संभवतो. तुमचे दोन्ही वेळचे चहा-पाणी, भोजन, औषधोपचार, कपडा वगैरे सर्व खर्च त्यांचेकडून बंद होऊं शकतात.

२) तुम्हांला घरांतून बाहेर काढले, परंतु घर तुमच्या नांवावर असेल, तर प्रथम तुम्हांला, तुमच्या घरांतून मुलांनी/वारसांनी बाहेर काढल्याबद्दल पोलीसांत तक्रार नोंदवावी लागेल.

३) सरकारने, अशा तक्रारदारांना न्याय मिळवतांना कोणताहि खर्च करावा लागूं नये, याची काळजी घेतली आहे. तक्रार अर्ज दाखल करतांना अगदीं रु.१०/- (रुपये दहा मात्र) चा कोर्ट फी स्टॅम्पहि त्या अर्जाला लागत नाही. मात्र **तक्रार दाखल करतांना तक्रारीच्या प्रतींसह पुराव्यांच्या प्रतीही प्रत्येक प्रतिवादीसाठी एक या हिशेबाने सादर कराव्या लागतात.**

४) या कायद्यांत अशी तरतूद आहे की, कोणत्याहि पातळीवरील सुनावणीचेवेळी, कोणत्याहि पक्षाने केंव्हांहि व्यावसायिक वकील देवूं नये. कारण स्पष्ट आहे की, वकील देण्यासाठी त्याचे शुल्क देणे अशा तक्रारदारांना परवडणारे नाही. प्रतिवादी मुले / वारस यांनीहि त्यांची बाजू मांडण्यासाठी कोणत्याहि पातळीवर सुनावणीसाठी वकील द्यावयाचा नाही. ज्येष्ठ नागरिकांना मात्र स्वतःची तब्येत, वयानुसारची आजारपणे, शारीरिक अवस्था व व्याधी, कार्यालयीन / न्यायालयीन वातावरणाचा मनांवर व त्यामुळे शरीरांवर होणारा परिणाम (रक्तदाब वाढणे, व/वा मधुमेही रोग्यांची रक्तशर्करा कमी जास्त होणे वगैरे..) यांचा विचार करुन प्रतिनिधी देतां येतो. याशिवाय जर मिळालेला निर्णय हा अपुरा असेल व त्यामुळे

अपेक्षित पूर्ण न्याय मिळत नसेल, तर अशा निर्णयाविरुद्ध अपील दाखल करण्याचा अधिकार फक्त तक्रारदार ज्येष्ठ नागरिकांना आहे.

५) मुलांनी/वारसांनी धमक्या देणे, शारीरिक मारहाण करणे, मानसिक छळ करणे, व मानहानीकारक वर्तन करणे, फौजदारी कलम ४९८अ खालील तरतुदींचा गैरवापर करण्यासाठी ज्येष्ठांविरुद्ध खोट्या तक्रारी दाखल करणे, असे प्रकार केले, व त्यामुळे या कायद्याखाली तक्रार करणे भाग पडत असेल, तर अशी तक्रार तयार करण्यापूर्वी धमक्या, धाकधपटशा, मारहाण, मानसिक छळ वगैरेबाबतचे पुरावे तक्रारीसोबत जोडावे लागत असल्यामुळे, प्रथम अशा प्रकारांविरोधांत पोलिसांकडे तक्रार/तक्रारी करणे आवश्यक ठरते. **या तक्रारींच्या प्रती पुराव्यादाखल या कायद्याखालील तक्रारीसह जोडाव्या लागतात.**

६) या कायद्याखाली तक्रार दाखल केल्यावर तक्रारदारावर मानसिक, भावनिक, शारीरिक दडपण प्रतिवादींकडून येण्याची शक्यता असते."बाहेरच्या बाहेर मिटवूं, कशाला पोलीस कचेऱ्या करतां ?" असे प्रस्ताव येतात. मात्र या प्रस्तावांबाबतचे निर्णय तक्रारदाराने स्वतःचे पूर्वानुभवाने घ्यावेत.पूर्वानुभव फसवणुकीचे असतील, तर असे प्रस्ताव नाकारुन ठामपणे ही लढाई लढावी लागते. कोणत्याहि कारणांखाली ह्या प्रक्रियेतून मध्येच माघार घेतली तर मिळवलेले सर्व गमावण्याची वेळ येते. **त्यामुळे एकदां या लढाईत उतरले की ती लढाई शेवटपर्यंत, कोणत्याहि परिस्थितीत लढण्याचा ठाम निश्चय करावा लागतो.**

७) कांही जण वृद्धाश्रमाची वाट धरण्याचा पर्याय विचारांत घेतात. वृद्धाश्रमाला सरकारी मान्यता असणे आवश्यक आहे. जर वृद्धाश्रमाला सरकारी अनुदान मिळत असेल तर त्या वृद्धाश्रमाची कार्यपद्धती अधिनियम २०१० खाली नियमित केली आहे.

वृद्धाश्रमाला जागा मिळणे, बांधकाम करणे, निवासाचे साहित्य वगैरेसाठी कमाल अनुदान रु.५०,००,०००/- (रुपये पन्नास लक्ष मात्र) सरकारकडून मिळूं शकते. हे अनुदान, जिल्हा न्यायदंडाधिकारी, समाजकल्याण अधिकारी, ज्येष्ठ नागरिकांच्या बिनसरकारी संघटनेचे प्रतिनिधी, जिल्हा पोलीस अधिक्षक वगैरेंच्या तपासणी समितीच्या तपासणी अहवालांतील शिफारशींनुसार हप्त्याहप्त्याने दिले जाते. **आवश्यक त्या तरतूदी झाल्या नसतील तर त्या वृद्धाश्रमांना दंड केला जातो, व सदर दंड रक्कम त्यांना मिळणाऱ्या अनुदानाच्या रकमेतून वसूल करुन घेतली जाते.**

अशा वृद्धाश्रमांना नजीकच्या इस्पितळांशी, निवासी वृद्धांच्या औषधोपचार व शस्त्रक्रिया यांबाबत लिखित स्वरुपाचे करार झाले असणे आवश्यक आहे. प्रत्येक निवासी वृद्धाला सदर वृद्धाश्रमांत किमान साडेसात चौ.मी. म्हणजे अंदाजे ७० चौ.फुट जागा वापरण्यास मिळणे आवश्यक आहे. सदर जागेत सदर वृद्धाची / वृद्धेची शयनव्यवस्था / कपाट व कोणी भेटण्यास आल्यास बैठकव्यवस्था अशी सोय असणे आवश्यक आहे. दोन्ही वेळचा चहा, नाष्टा, दोन्ही भोजने यांसह औषधोपचार व वर्षातून किमान दोन वेळेस कपडे अशी सोय असणे अपेक्षित आहे.

अशा वृद्धाश्रमांनी दरवर्षी १ जानेवारी /१ जुलै अशा दर सहा महिन्यांनी रिकाम्या जागांसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन गरजूंकडून अर्ज मागविणे आवश्यक आहे. अशा जाहिरातींना मिळालेल्या प्रतिसादादाखल आलेल्या अर्जांची छननी होऊन तीनुसार जागा वाटप करतांना, अत्यंत वयोवृद्ध, कफल्लक, निर्धन, गृहहीन, व आजारी बेवारस वृद्धांतहि स्त्रियांना प्राधान्य देऊन उर्वरित जागा पुरुष अर्जदारांना देतां येतील. यामागे अशा वृद्ध स्त्री-पुरुषांचा "शेवटचा दीस" नीट व्हावा हा हेतू आहे. **केवळ "मुले/वारस विचारीत नाहीत" हे कारण अशा वृद्धाश्रमांनी विचारांतहि घेण्याचे कारण नाही.** स्त्रियांनंतर पुरुषांचा विचार होईल. वर दिलेल्या एकूण ६ प्रकारांपैकी क्रमानुसार एक एक प्रकार कमी करीत छाननी केल्यानंतर जे वृद्ध अर्जदार प्रवेशपात्र ठरतील, त्यांना प्रवेश मिळेल.

वरील मजकूर वाचल्यावर ध्यानीं यावे की, उठसूट कुणालाही मुले व वारस असणाऱ्यांना अशा वृद्धाश्रमांत प्रवेश मिळणे अवघड किंबहुना अशक्य आहे.

८) पैसा असेल तर प्रश्न उभे रहात नाहीत, पण पैसा नसेल तर **"नो मनी पुसेना कोणी"** ही स्थिती येऊं शकते. त्यामुळे वृद्धांनी **"प्रसंगी जेवणाचे ताट द्यावे, परंतु बसण्याचा पाट देऊं नये"** ही म्हण लक्षांत ठेवून, स्वतःच्या शिल्लक रकमांचे नियोजन करावे व मगच मुलांना/वारसांना काय देण्याची इच्छा असेल ते द्यावे. पैसा नसेल तर तुम्ही कांहीच करुं शकत नाही, परंतु पैसा असेल तर स्वतःला उघड्यावर येण्यापासून वाचवूं शकतां.

९) तुमच्याकडे पैसा असेल, तर तुम्ही या कायद्याखाली तक्रार केल्याचा परिणाम म्हणून तुमचे प्रतिवादी वारस प्रसंगी तुमच्या विरोधांत, कौटुंबिक हिंसाचारापासून विवाहित महिलेला संरक्षण देणारा कायदा २००५, फौजदारी संहिता कलम ४९८ तसेच आर्थिक फसवणुकीबाबतच्या अन्य कलमांखाली वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या कारणांखाली न्यायालयामध्ये दावे लावूं शकतात, व प्रसंगी कोठेहि त्यांचेविरोधांत निकाल गेल्यास उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावतात. असे दावे केवळ तुम्हाला हैराण

करुन माघार घेण्यासाठी भाग पाडण्याकरितां असतात. असे दावे दीर्घकाळ कसे चालतील, वारंवार तारखा कशा पडतील यासाठी विविध कारणांचा वापर होऊं शकतो. **म्हणजे जवळ पैसा नाही म्हणून जसे त्रास व प्रश्न असतात, तसेच त्रास व प्रश्न जवळ पैसा आहे म्हणूनहि असूं शकतात, हे ध्यानीं घ्यावे.** ह्या सर्व प्रकारांत दाव्यांची सुनावणी चालूं असतांना मारहाण होण्याचाहि समावेश आहे. प्रतिवादी मुले/वारस स्वभावाने किती प्रमाणांत दुष्ट आहेत त्यावर हे अवलंबून असते.

१०) वरील सर्व विवेचन हे कायद्याखाली तक्रार केल्याने काय काय होऊं शकते याचे विवरण आहे. हे सर्व विवेचन यासाठी केले आहे की, अर्जदार तक्रारदारांनीया गोष्टी अनपेक्षित असूं नयेत. **यांत कोणालाहि घाबरविण्याचा हेतू नाही. परिणामांची माहिती असली की त्या प्रकारचा छळ सहन करण्यासाठी मानसिक तयारी होऊं शकते. यासाठी हे विवेचन आहे.** कारण आज तरी हा कायदा याबाबत वृद्धांना संरक्षण देत नाही. तथापि, यावरील उपाय योजनांचा तपशील पुढील लेखात देण्यात येईल.

ब) सुनावणीची कार्यपद्धती –

१) तहसीलदार / समेटकर्ता अधिकाऱ्याच्या पातळीवर –

समेटकर्ता अधिकाऱ्याची नियुक्ती दर्शविणारे पत्र व तक्रार त्याचेकडे मिळाल्यावर त्याने प्रथम दोन्ही पक्षांना (तक्रारदार ज्येष्ठ नागरिक व जाब देणार प्रतिवादी वारस) सुनावणीसाठी सूचनापत्र (समन्स) काढावयाचे असून, सूचनापत्र दोन्ही पक्षांना पाठविण्याच्या दिनांकापासून ३० दिवसांमध्ये समेट घडविण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

सुनावणी सूचनापत्र काढल्यानंतर जाब देणार प्रतिवादी उपस्थित होत नसल्यास, एकतर्फी निर्णय जाहीर करावयाचा असून संबंधित निर्णयाच्या निश्चितीसाठी (confirmation) त्याने सदर निर्णय व तक्रारी संबंधीचे कागदपत्र वरिष्ठांकडे (उपविभागीय अधिकारी/न्यायाधिकरणाचे अध्यक्ष) पाठवावयाचे आहेत.

सुनावणीच्या दरम्यान दोन्ही पक्ष सुनावणीस उपस्थित राहिल्यास त्यांचेशी चर्चा करुन समेट घडविण्याचा प्रयत्न करणे, व समेट झाल्यास, कोणत्या मुद्यांवर समेट झाला आहे त्याचे विवरण देणारा अहवाल व तक्रार अर्ज व संबंधित कागदपत्रे वरीलप्रमाणे वरिष्ठांकडे पाठविण्याची आहेत.

समेट होऊ शकत नसल्यास, समेट होऊ न शकल्यांच्या कारणांचे विवरण देणारा अहवाल व तक्रार अर्ज व संबंधित सुनावणी बाबतची कागदपत्रे त्याने वरीलप्रमाणे वरिष्ठांकडे पाठविण्याची आहेत.

२) उपविभागीय अधिकारी / प्राधिकरणाचे पदस्थ अध्यक्ष/अधिकारी यांचे पातळीवर -

समेटकर्ता अधिकाऱ्याकडून मूळ तक्रार अर्ज व संबधित सुनावणीची कागदपत्रे, तसेच समेट झाला असल्यास, त्यानुसार निश्चितीसाठी (confirmation) दोन्ही पक्षांना सुनावणी सूचनापत्र पाठवून, प्रत्यक्ष चर्चेमध्ये दोन्ही पक्षांनी निश्चित केलेल्या मुद्यांवर त्यांचेकडून सदर मुद्दे मान्य असल्याबाबत व त्यानुसार समझोता होत असल्या बद्दलचे पत्र घेऊन व समेटकर्ता अधिकाऱ्यांच्या शिफारशी पाहून, त्याप्रमाणे आदेश पारित करावयाचा आहे.

जर समेटकर्ता अधिकाऱ्याने एकतर्फी निर्णय ज्येष्ठांच्या बाजुने दिला असेल, तरी संबंधित निर्णयाचे निश्चितीकरण (confirmation) करण्यापूर्वी दोन्ही पक्षांना सुनावणी सूचनापत्र पाठवून त्याने दोन्ही पक्षांमध्ये तडजोड घडविण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. तसेच आवश्यक ते साक्षीपुरावे नोंदवून घ्यावयाचे आहेत.

ह्या पातळीवरहि जाब देणार प्रतिवादी हे सुनावणी सूचनापत्रानुसारच्या सुनावणीस उपस्थित राहत नसतील तर संबंधित उपविभागीय अधिकारी / प्राधिकरणाचे पदस्थ अधिकारी / अध्यक्ष, आणखी एक सुनावणी सूचनापत्र तलाठी किंवा पोलीस अधिकाऱ्यामार्फत प्रतिवादी जाब देणार वारस यांना देऊन सुनावणीसाठी उपस्थित राहण्यास भाग पाडू शकतील.

समेट होत नसेल तर त्या कारणांचा समावेश सुनावणी तपशीलांत करुन उपविभागीय अधिकारी / प्राधिकरणाचे पदस्थ अधिकारी / अध्यक्ष हे चरितार्थ व कल्याण विषयक आवश्यक ते आदेश पारित करतील.

सदर आदेश पारित झाल्यापासून ३० दिवसांत आदेशाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी या विहित मुदतीत न झाल्यास अर्जदार ज्येष्ठ नागरिक यांनी सदर प्रकार आदेश पारित करणारे उपविभागीय अधिकारी / प्राधिकरणाचे पदस्थ अधिकारी / अध्यक्ष यांना अर्जाने कळवावयाचा असून, आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत प्रार्थना करावयाची आहे. अशावेळी, अशा अर्जावर सदर संबंधित अधिकाऱ्यांनी सरकारी सारा वसुलीसाठी ज्या अधिकारांचा वापर त्यांचेकडून होतो त्या अधिकारांचा वापर करुन, अर्जदार ज्येष्ठ नागरिकाला त्याचे प्रतिवादी वारसांकडून येणे असलेली विलंबित चरितार्थ रक्कम वसूल करुन द्यावयाची आहे.

समेटकर्ता / तहसीलदार यांनी दिलेल्या निर्णयावर, तसेच उपविभागीय अधिकारी / प्राधिकरणाचे पदस्थ अधिकारी / अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्णयावर अपील करण्याचा अधिकार फक्त अर्जदार ज्येष्ठ नागरिक यांना असून, जाब देणार प्रतिवादी यांना नाही.

तहसीलदार / समेटकर्ता अधिकारी यांनी दिलेला निर्णय मान्य नसल्यास त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा सुचविण्याचा अधिकार अर्जदार ज्येष्ठ नागरिकांना असून, त्याचा विचार उपविभागीय अधिकारी/पदस्थ अध्यक्ष यांनी, समेटकर्ता अधिकारी यांचे शिफारशींचा विचार करतांना करावयाचा आहे, व त्यानंतर आदेश पारित करावयाचा आहे.

३) जिल्हाधिकारी/निवासी उपजिल्हाधिकारी/न्यायाधिकरणांतील अपीलीय अधिकारी यांचे पातळीवर –

जर उपविभागीय अधिकारी/पदस्थ अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्णयावर जर अर्जदार ज्येष्ठ नागरिकांनी अपील दाखल केले असेल तर त्या अपीलाची सुनावणीची सर्व प्रक्रीया पार पाडून आदेश पारित करणे, तसेच,

जाब देणार प्रतिवादी यांनी पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी केली नसल्यास, तसा अहवाल उपविभागीय अधिकारी/पदस्थ अध्यक्ष यांजकडून आला असल्यास, तसेच; प्रतिवादी जाब देणार हे हेतुपुरस्सर सहकार्य करीत नाहीत असे आढळल्यास, संबंधित प्रतिवादी जाब देणार यांचे विरोधांत फौजदारी संहितेखालील संबंधित कलमांनुसारची कारवाई करण्याचे अधिकार वापरुन दंडात्मक कारवाई करावयाची आहे.

ह्या पातळीवरील कोणत्याहि निर्णयाविरुद्ध जाब देणार प्रतिवादी हे केवळ उच्च न्यायालयातच अपील दाखल करुं शकतात.

मा.जिल्हाधिकारी / निवासी उपजिल्हाधिकारी / अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी विहित मुदतीत प्रतिवादी अर्जदार यांनी न केल्यास या कायद्यात सुचविलेली तुरुंगवासाची तसेच दंडरक्कम वसुलीची कारवाई फौजदारी व दिवाणी अधिकाराखाली संबंधित अधिकारी करतील.

परदेशस्थ प्रतिवादी वारस यांजवर या कायद्याखाली कारवाई, संबंधित देशातील भारतीय वकिलातीमार्फत करतां येईल.

या संपूर्ण सुनावणी प्रक्रियेत जर प्रतिवादी जाब देणार यांनी अर्जदार ज्येष्ठ नागरिकांविरुद्ध अन्य कोणत्या दिवाणी वा फौजदारी कारवाईसाठी तक्रार अर्ज गुदरले, तर संबंधित न्यायालयासमोर संबंधित अर्जदार व प्रतिवादी यांतील वाद या कायद्याखाली चालू असल्यामुळे, संबंधित तक्रारी

अर्जाबाबत संबंधित न्यायालयांना न्यायक्षेत्र (Jurisdiction) नसल्याचे त्यांचे निदर्शनास आणणे आवश्यक आहे.

क) ज्येष्ठांना अनुकूल असलेल्या, या कायद्यातील बाबी -

कायदा करतांना सरकारने ज्येष्ठांना न्यायप्रक्रियेतील विलंबाचा फटका बसू नये या बाबीचा विचार केला आहे. या कायद्याचा उद्देश असा आहे की, ज्येष्ठांना कमाल ९० दिवसांत न्याय मिळावा. यासाठी या कायद्यातील तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

१) कायद्याचे कलम ५ पोट कलम ४ नुसार अर्जाची नोटीस बजावल्यापासून अर्ज **९० दिवसांत** निकालात काढण्यात येईल, मात्र,

२) अपवादात्मक परिस्थितीत सदर कालावधी कमाल ३० दिवस फक्त एकदां वाढविता येईल. याचा स्पष्ट अर्थ असा आहे, की अर्ज निकाली काढण्याचा काळ ९० दिवसांपासून १२० दिवसांपर्यंत असू शकेल, शिवाय हा कालावधी नोटीस बजावल्या दिनांकापासून मोजावयाचा आहे. अर्ज कोणत्याही पातळीवरील अधिकाऱ्याला मिळाल्या दिनांकापासून काळ मोजावयाचा नाही, हे अध्याहृत आहे.

३) जर पारित झालेल्या आदेशावर कोणी अपील केले, (२००७ चे कलम १६, उपकलम १) तर ते अपील, अपील करणाऱ्या अर्जदार ज्येष्ठाने आदेश पारित झाल्या दिनांकापासून साठ दिवसांत अपील करणे आवश्यक आहे. या साठ दिवसांत जर कांही वाजवी कारणांमुळे अपील दाखल होऊं शकले नाही व / वा परिस्थितीमुळे वेळेवर अपील दाखल होण्यास प्रतिबंध झाला, याची खात्री न्यायाधिकरणाला पटली, तर न्यायाधिकरण साठ दिवसांचा अवधी संपून गेल्यावरहि अपील दाखल करुन घेऊं शकेल. याशिवाय न्यायाधिकरण अपील दाखल करुन घेतल्यावर, दोन्ही पक्षांची बाजू ऐकून घेतल्यावरच, तीस दिवसांत अपीलाचा निर्णय लेखी स्वरुपांत देण्याचा प्रयत्न करील. (समजा, अपील दाखल झाले नाही, तरी पारित आदेशाची अंमलबजावणी आदेश पारित झाल्या दिनांकापासून तीस दिवसांत (निर्वाह भत्याबाबतचे कलम १३ मधील तरतुदींनुसार) झाली नाही तर वादी, आदेश पारित झाल्या दिनांकापासून साठ दिवसांत न्यायाधिकरणाकडे त्याबाबत अर्ज करु शकेल.)

४) आई-वडील वा ज्येष्ठ नागरिक यांनी आपलेविरुद्ध अशी तक्रार दाखल केली आहे हे समजल्यावर, मुले वा वारस प्रसंगी तक्रारदारांचे मिळकतीवर न्यायालयांकडून टांच आणण्याचा प्रयत्न

करुन अर्जदारांवर आर्थिक अनुचित दबाव आणून त्यांना हैराण करण्याचा प्रयत्न करतील, हे विचारांत घेऊन, २००७ च्या या **कायद्यातील कलम २७ नुसार अशा ज्येष्ठ नागरिकांच्या मिळकतीबाबत कोणतेही दिवाणी न्यायालय कोणताही आदेश देऊ शकणार नाही**, अशी तरतूद केली आहे. या कायद्यातील ही तरतूद अत्यंत स्वागतार्ह आहे.

५) जी कांही निर्वाह भत्ता/पोटगी रक्कम न्यायाधिकरणाकडून निश्चित होईल, ती रक्कम २००७ च्या कायद्याच्या कलम १३ नुसार, तीस दिवसांच्या आंत प्रतिवादींनी अर्जदारांना अदा करण्यास प्रारंभ करणे आवश्यक आहे. असे न झाल्यास अर्जदार वादींना त्याच कायद्याच्या कलम १६ उपकलम १ प्रमाणे ६० दिवसांत अर्ज करावा लागेल, व त्या अर्जात मागणी केल्यानुसार न्यायाधिकरणाकडून, अर्जाच्या दिनांकापासून देय रकमेवर, दरसाल दरशेकडा ५ ते ८ या दराने सरळव्याज देण्याचा आदेश पारित होईल.(केंद्रीय कायद्यात असे व्याज दरसाल दरशेकडा ५ ते १८ असा उल्लेख आहे.)

६) वादी अर्जदाराने पोटगीसाठी एकाच वेळी या कायद्याखाली व फौजदारी संहिता कलम १२५ खालील अर्ज करणे अपेक्षित नाही. जर अर्जदाराला या कायद्याखाली निर्वाह भत्त्यासाठी अर्ज करावयाचा असेल, व त्याचा फौजदारी संहिता कलम १२५ खालील अर्ज न्यायालयामध्ये विचाराधीन असेल, तर न्यायालयाकडे अर्ज करुन त्याला तो अर्ज मागे घेण्याची विनंती करतां येईल, व त्यास संबंधित न्यायालय तशी परवानगी देईल.

७) या कायद्याखाली अर्ज करणाऱ्या अर्जदारांना स्वत:च्या निर्वाह भत्त्यासाठी खर्च करावा लागू नये, म्हणून या कायद्याखाली अर्ज करणारांना कोर्ट फी स्टॅम्पही अर्जास लावावा लागत नाही. गरीब व विपन्न अवस्थेतील अर्जदारांच्या हिताची ही गोष्ट आहे.

८) अर्जदार ज्येष्ठ नागरिक व आई-वडील, स्वत:ची तक्रार दाखल करतांना प्रतिनिधी नेमूं शकतील, मात्र असा प्रतिनिधी हा व्यावसायिक वकील असणार नाही. त्याचबरोबर प्रतिवादींनीहि स्वत:चा प्रतिनिधी न्यायाधीकरणाच्या परवानगीने नेमणे अपेक्षित आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये मूळ अर्ज सुनावणीपासून ते अर्जाचा निर्णय होईपर्यंतच्या कोणत्याही स्तरावर व्यावसायिक कायदे सल्लागारांचा समावेश असणार नाही. (२००७ चे कायद्याचे कलम १७).

९) अर्जदार वार्दीच्या अर्जावरील प्रत्येक पातळीवरील निर्णयाची प्रत, वादी व प्रतिवार्दीना प्रत्यक्ष, वा आदेशिकावाहकामार्फत, वा नोंदणीकृत टपालाने न्यायाधिकरणाकडून पाठविण्यात येईल. (२०१० चे अधिनियमाचे कलम १३, उपकलम ४.)

१०) ज्येष्ठ नागरिक / आई-वडील, यांचे पालन करणेची जबाबदारी ज्यांचेवर आहे, त्यांनी त्यांना कोठेही सोडून दिल्यास, व त्यामार्गे त्यांची स्वत:वरील जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केल्यास, संबंधित व्यक्ति २००७ च्या कायद्यातील कलम २४ नुसार अपराधी ठरेल, व त्यास तीन महिने मुदतीपर्यंतचा कारावास वा रक्कम रु.५,०००/- पर्यंतचा दंड, वा दोन्ही, अशा शिक्षेस पात्र ठरेल.

११) ज्येष्ठ नागरिकांबाबतचा कोणताही गुन्हा, त्यांची जबाबदारी ज्यांच्यावर आहे अशांनी केला असेल, तर तो या २००७ कायद्याखालील कलम २५ नुसार दखलपात्र व जामीनपात्र असेल. तसेच अशा गुन्ह्याची संक्षिप्त संपरिक्षा (Summary Proceedings) केली जाईल.

१२) ज्येष्ठ नागरिकांच्या अशा तक्रारींची दखल प्रत्येक पातळीवर वेळेत घेतली जावी, यासाठी शासन यंत्रणेचे समाजकल्याण खाते, गृह खाते (पोलिस), आणि न्याययंत्रणा यांचे आपसांत प्रभावी व परिणामकारी समन्वयन असावे, यासाठीच्या तरतूदी अधिनियम २०१० मध्ये केल्या असून, त्यानुसार पोलिसांनी दरमहाचे १० तारखेचे विवरणपत्र जिल्हा पोलिस पर्यवेक्षक (District Superintendent of Police) यांजकडे पाठवावयाचे आहे. जिल्हा पोलिस पर्यवेक्षक यांनी दरमहाचे २० तारखेचे विवरणपत्र जिल्हा न्यायदंडाधिकारी यांजकडे सादर करावयाचे आहे. जिल्हा न्यायदंडाधिकारी यांनी तिमाही विवरणपत्र राज्यस्तरीय न्यायाधिकरणाकडे दाखल करावयाचे असून, राज्यस्तरीय न्यायाधिकरण सहा महिन्यांतून किमान एकदां, वा वर्षातून किमान दोन वेळां किंवा आवश्यकतेनुसार अधिक वेळां कामकाजाचा परामर्ष घेईल, व ज्येष्ठांचे प्रश्न शक्य तितक्या तांतडीने सोडविण्याचे प्रयत्न होतील. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, पोलिस यंत्रणा, जिल्हा न्यायदंडाधिकारी, तसेच न्याययंत्रणा, यांपैकी प्रत्येकाचे अधिकार व कर्तव्य, व त्याबाबतची कार्यप्रद्धती याबाबतचे स्पष्ट निर्देश २०१० च्या अधिनियमांत दिलेले असून, त्यांत वृद्धाश्रमांबाबतच्या नियमांचाहि समावेश करण्यांत आला आहे.

१४) अन्य फौजदारी कायद्यांप्रमाणे हा २००७ चा कायदा, व २०१० चे अधिनियम, हे गुन्हेगारांना शिक्षा देणारे व संभाव्य गुन्हेगारांवर वचक बसवूं शकतील असे आहेत. मात्र यांत माता-पिता व त्यांची अपत्ये यांतील संबंधांचा नाजूक भाग गुंतलेला आहे. मुळांत आई-वडील मुला-मुलींतिरुद्ध तक्रार करुं

धजावत नाहीत. कारण त्यांत अपत्यांशी अगोदरच असलेले तणावपूर्ण संबंध अधिकच बिघडण्याची त्यांना भीति वाटत असते. याशिवाय नातवंडांच्या कपाळावर "गुन्हेगारांची अपत्ये" असल्याचा शिक्का बसण्याची भीतिहि त्यांना असते. सन २००५ मधील वारसा कायद्यातील दुरुस्तीमुळे, वडिलांनी मिळवलेल्या मिळकतीत मुलांच्या बरोबरीने मुलींनाही हिस्सा मिळतो. मुलांची मानसिक अवस्था आतां अशी होत आहे की, जर मुलांच्या बरोबरीने मुलींनाही मिळकतीत हिस्सा मिळत असेल, तर मुलांच्या बरोबरीने मुलींनीही आई वडीलांची जबाबदारी स्वीकारावी. कायद्यात कुठेही आता "निपुत्रिक" अशा उल्लेखाऐवजी "विनापत्य" असा उल्लेख होणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार मुलीही आपणहून आई वडीलांची जबाबदारी विवाहोत्तरहि स्वीकारत आहेत. **या बाबींचा सन्मान होणे आवश्यक आहे.** यामुळे जर मुले असतील, तर मुलांनी जबाबदारी स्वीकारावी व मुलींवर त्यांच्या विवाहोत्तर काळांत आई वडीलांची जबाबदारी राहूं नये, या विचाराला, बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार व वारसा कायद्यातील बदलानुसार विसरले पाहिजे.

१५) वरील मुद्यातील विचारानुसारहि, २००७ च्या कायद्यातील मुलांच्या बरोबरीने मुलींचाहि जबाबदार व्यक्ती म्हणून उल्लेख होणे आवश्यक असल्यामुळे, मुले अगर मुली असे न संबोधतां वारस म्हणून संबोधले गेले आहे. ही अभिनंदनीय बाब आहे.

१६) सन २००७ चे कायद्यातील कलम ५ पोटकलम १ नुसार, स्वत: अर्जदार तक्रार दाखल करुं शकतील, वा ते स्वत: तक्रार दाखल करण्यास असमर्थ असतील, तर ते प्रतिनिधीमार्फत अर्ज दाखल करुं शकतील, व अशा प्रतिनिधींमध्ये ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यकर्ते/पदाधिकारी, आई वडील वा संघटनांचा समावेश होतो. अर्थात प्रत्यक्षांत अशी संघटना वा ज्येष्ठ नागरिक, वा तक्रारदाराचेवतीने अर्ज दाखल करणारा कुणीही, हा अर्जदाराचा प्रतिनिधी असेल, व त्याला अर्जासह प्राधिकारपत्रहि दाखल करावे लागेल. ही तरतूद स्वागतार्ह असून, अंथरुणाला खिळलेल्या तक्रारदारांच्या हिताची आहे. **या कायद्याखालील न्यायाधिकरण, प्रसंगी, एखादा कफल्लक, निराश्रित / परित्यक्त्य, आजारी, जराजर्जर, अर्जदेखील करुं न शकणारी व्यक्ती नजरेस आल्यास, सदर व्यक्तिच्यावतीने स्वत: (su moto) अर्ज दाखल करुन घेऊन त्या ज्येष्ठ व्यक्तीचा प्रश्न सोडवूं शकेल.**

१७) या कायद्यातील अधिनियम २०१० चे कलम ९ चे उपकलम १ यानुसार अर्जदारास जर प्रतिवादींच्या संख्येत वाढ करावयाची इच्छा असेल, तर त्याच्या मूळ अर्जाच्या प्रथम सुनावणीच्यावेळीच

त्याला तसा अर्ज दाखल करावा लागेल. जर एखाद्या प्रतिवादीनेच, त्याच्यावरच्या ज्या जबाबदारीसाठी त्याला प्रतिवादी करण्यांत आले आहे, ती जबाबदारी अन्य कोणाचीही आहे, असा अर्ज दाखल करुन, जर प्रतिवादींचे संख्येत वाढ करावयाची असेल, तर त्याला तसा अर्ज मूळ तक्रारदाराच्या अर्जाच्या प्रथम सुनावणीचे दिवशीच दाखल करावा लागेल, व त्यासह त्याला पुरेसे कारण अशा प्रतिवादींच्या संख्येच्या वाढीसाठी द्यावे लागेल. मात्र असे कारण पुरेसे नसल्यास, त्याला पुन्हां अशा प्रकारचा अर्ज दाखल करतां येणार नाही. अर्थात वादीहि स्वत:च्या अशा अर्जामध्ये प्रतिवादींच्या संख्येच्या वाढीसाठी पुरेशी कारणे देऊं शकला पाहिजे, तरच त्याचा अर्ज मंजूर होईल व प्रतिवादींची संख्या वाढूं शकेल. हे बंधनहि स्वागतार्ह आहे. त्यामुळे वादी किंवा प्रतिवादी कोणीही मध्येच असा अर्ज दाखल करुन सुनावणीमध्ये अडथळे आणूं शकणार नाहीत.

१८) मात्र या २००७ च्या कायद्यातील कलम ५ मधील पोटकलम ५ च्या तरतुदीनुसार, या अर्जातील प्रतिवादी अन्य जबाबदार वारसांवर खटला दाखल करुं शकेल.

ड) चरितार्थ रकमेच्या बाबतच्या तरतुदींनुसार कोणत्याहि ज्येष्ठ नागरिकाला एकाचवेळी फौजदारी संहिता कलम १२५ व हा कायदा अशा दोन्ही कलमांखाली, फौजदारी न्यायालयात व समेटकर्ता अधिकारी या दोघांकडून मागणी करता येणार नाही. जर फौजदारी न्यायालयांत कलम १२५ खाली दावा चालू असेल तर ह्या कायद्याचा वापर अर्जदाराला करतां येणार नाही. मात्र जर ह्या कायद्याचा ~~पावर~~ वापर करुन लवकर निकाल मिळवावयाचा असेल तर अर्जदाराला, संबंधित न्यायालयाकडे अर्ज करुन फौजदारी कलम १२५ खालील तक्रार मागे घेण्यास परवानगी मिळण्यासाठी विनंती अर्ज करावा लागेल व संबंधित न्यायलय सदर विनंती अर्जावर सकारात्मक निर्णय घेऊन तक्रार अर्ज मागे घेण्यास संमती देईल.

इ) <u>ज्येष्ठांना मोफत कायदे साह्य देण्याबाबतचे राष्ट्रीय धोरण – २०१६</u>

१) व्यक्तिगत आयुष्यांत कोणीहि कितीहि धर्माचरणी असो किंवा नसो, सार्वजनिक आयुष्यांत, आणि गरजेनुसार राजकीय आयुष्यांतहि कट्टर धर्माभिमानी असणारेहि कौटुंबिक आयुष्यांत धर्माचरणी असतीलच असे नाही, म्हणून हिंदु कायदा हिंदु दत्तकविधान व प्रतिपालन कायदा, मुस्लीम कायदा वगैरे धर्मविषयक कायद्यांत आईवडील व अन्य ज्येष्ठांच्या चरितार्थ व कल्याणाबाबत कांहीहि तरतुदी केल्या असल्या, व त्यांचे प्रतिपालन करणे मुलांचे व वारसांचे कर्तव्य असल्याबाबत नमूद केले असले, तरी

स्वत:च्या सोयीनुसार व मर्जीनुसार या कर्तव्याबाबत बेफिकीर राहणारे, व प्रसंगी आईवडील व ज्येष्ठांचे मानसिक, शारिरीक, व आर्थिक छळ करणारे वारस, व मुले, मुली समाजांत आहेत, म्हणून आईवडील व ज्येष्ठ नागरिक चरितार्थ कल्याण कायदा २००७ व अधिनियम २०१० सारखे कायदे करणे सरकारला भाग पडले आहे. हे यापूर्वी आपण पाहिले आहे.

२) जेंव्हा २००७ च्या कायद्याखालील तक्रारींची सुनावणी होत असतांना-

१. आईवडीलांनी मुलांचा मानसिक, शारिरीक छळ केला आहे.

२. आईवडील सतत भांडतात, आम्हां मुलांकडे दुर्लक्ष त्यांनी केले आहे.

३. मुलांच्या आर्थिक गरजा आईवडीलांनी हव्या त्या वेळेला शैक्षणिक बाबतीतही भागविल्या नाहीत.

४. मुलामुर्लीना व सून, जावई यांना, व नातेवाईकांना, घालूनपाडून बोलून वारंवार अपमान त्यांनी केले आहेत, त्यामुळे बाकी कोणी नातेवाईक त्यांना टाळतात,

५. आईवडील वा दोघांपैकी कोणीहि एक व्यसनी असून, त्यांचे चरित्र व चारित्र्यहि शंकास्पद आहे, त्यामुळे घरांत मुलांवर वाईट परिणाम होण्याची शक्यता आहे,

अशी कारणें देण्याचा प्रयत्न प्रतिवादींकडून होतो, तेंव्हा हे स्पष्ट करणे भाग पडते की, **कोणत्याहि कारणांखाली आईवडील व ज्येष्ठ नागरिकांकडे दुर्लक्ष करण्याची सोय या कायद्यांत कोणत्याहि तरतुदीखाली नाही.**

३) आईवडील व ज्येष्ठ नागरिक यांना स्वत:कडे घरांत, वा घरांत जागा नसल्यास अन्यत्र, गरजेप्रमाणे जवळपास भाडेकराराच्या जागेत ठेवून, त्यांना चरितार्थ रक्कम देऊन त्यांचेवर लक्ष ठेवणे, वारसांवर बंधनकारक आहे. कायद्यांत असे स्पष्टपणे, स्पष्टभाषेत नमूद केले नसले तरी सर्व तरतुदीं मिळूनचा सारांश हाच आहे. जर अनुदानित वृद्धाश्रमांत आईवडीलांना प्रवेश मिळणे अधिनियम २०१० मधील प्रवेशप्रक्रियेबाबतच्या तपशीलांतील अटींमुळे शक्य होत नसेल, व घरांत जागा नसेल तर भाडेकराराने जागा घेण्याशिवाय वारसांना पर्याय नाही, ही या प्रश्नाची प्रात्यक्षिक सोडवणूक आहे. घरांत जागा नाही हे प्रतिवादींला सिद्ध करावे लागेल.

४) यापूर्वी आपण घराबाहेर काढलेल्या आईवडील व ज्येष्ठांची आर्थिक व मानसिक परिस्थिती काय असेल याचा विचार केला आहे. रस्त्यावर आलेल्या ज्येष्ठांना चहाच्या कपालाहि मोताद व्हावे लागते.

त्यांना स्वत:च्या कायदेशीर हक्काची अंमलबजावणी करण्यासाठी कायदेप्रक्रियेवर खर्च करण्याची ऐपत नसते, कारण प्रसंगी त्यांना नेसत्या वस्त्रानिशी बाहेर काढले गेलेले असते. अशांनाहि कायदेसाह्य मिळावे, यासाठी केंद्र सरकारने National Policy for Legal Assistance to Senior Citizens 2016 तयार केले आहे. 'ज्येष्ठांसाठी मोफत कायदेसाह्यांबाबतचे राष्ट्रीय धोरण २०१६' असे आपल्याला म्हणतां येईल.

५) या धोरणानुसार केंद्र सरकारने, राज्य सरकारांनी २००७ चा कायदा व २०१० चे अधिनियम यांखालील तक्रारअर्जांच्या सुनावणीप्रक्रियेच्या प्रत्येक पातळीवर ज्येष्ठांना नि:शुल्क सेवा मिळावी, यासाठी त्या प्रत्येक पातळीवर कायदेसल्लागारांचे मंडळ (Lawyers Panel), कायदेसाह्य स्वयंसेवक (Para Legal Volunteers), कायदेसल्लाकेंद्रे वगैरे. नियुक्त केले जावेत असे धोरण तयार केले आहे. याची कारणे यापूर्वी आपण पाहिली आहेत ती म्हणजे –

अ) कायदेशीर लढाई लढण्यासाठी जवळ रक्कमच ज्येष्ठांकडे नसते व,

आ) त्या खर्चासाठीही ज्येष्ठांना प्रतिवादी वारसांवर अवलंबून रहावे लागणें, व अशावेळी वारसांकडून निश्चितपणे नकार मिळणें, अशी आहेत.

६) सन २००७ चा कायदा व २०१० चे अधिनियमांत आवश्यक असलेल्या दुरुस्त्या राज्यसरकारने केल्यावर त्या कायद्यांची परिणामकारकता वाढणार आहे, ती परिणामकारकता वाढल्यावरच २०१६ च्या धोरणाच्या मदतीने उद्धट, उर्मट, बेफिकीर, दुष्टप्रवृत्तीच्या वारसांवर कायद्याचा वचक बसणार आहे.

७) वकीलबंधूंनी या कायद्याखाली कोणाहि अधिकाऱ्यासमोर या कायद्यांखाली कोणत्याहि व्यक्तीचे काम पाहतांना, वकील म्हणून नव्हे तर 'प्राधिकारी' म्हणूनच काम पाहणे उचित ठरेल.

दिनांक : २२/१२/२०१८, शनिवार

(ब.त्र्यं.निसळ)
कायदे सल्लागार फेस्कॉम